मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १३७ ■ शनिवार, २४ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# पुणे ग्रँड टूर स्पर्धा; ल्यूक मुडग्वेच्या नेतृत्वाखाली 'ली निंग स्टार' संघ विजयी

**दैनिक युवक आधार**

**पुणे :** 'पुणे प्राइड लूप'मध्ये उसळलेली गर्दी आणि उत्साहाच्या वातावरणात शुक्रवारी 'बजाज पुणे ग्रँड टूर स्पर्धे'चं शानदार समारोप झाला. यात पुण्यातील टप्प्यात ली निंग स्टार संघाच्या ल्यूक मुडग्वेनं बाजी मारली. तर सांघिक विजेतेपद ली निंग स्टार संघानं पटकावलं. चौथ्या आणि अखेरच्या टप्प्यात श्वायर्को ॲलिक्सेईनं (1 तास 56 मिनिटे 54 से.) अव्वल क्रमांक पटकावला. पाच दिवसांच्या स्पर्धेनं जगात भारताचं पर्यायानं पुण्याचं नाव उंचावलं आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, अभिनेता आमिर खान आणि केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते 'पुणे ग्रँड टूर'च्या अंतिम टप्प्याला श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी इथं झेंडा दाखवून शुभारंभ केला.







चीनच्या संघानं राखलं वर्चस्व : शुक्रवारी झालेल्या चौथ्या टप्प्यात सायकलस्वारांनी शहराच्या मध्यभागातून 95 किलोमीटरचा प्रवास केला. 578 मीटरची चढण पार करून ही शर्यत पुण्याच्या अनेक ऐतिहासिक रस्त्यांवरून आणि शनिवारवाड्यासारख्या वास्तूंच्या जवळून गेली. चार टप्प्यात सायकलस्वारांनी एकूण 437 किलोमीटर अंतर पार केलं. यात ली निंग स्टार संघानं 28 तास 41 मिनिटे 19 सेकंद अशा एकत्रित वेळेसह संघ क्रमवारीत अव्वल स्थान पटकावलं. ल्यूक मुडग्वे याच्या सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर चीनच्या या संघानं सर्व चार टप्प्यांवर आपलं वर्चस्व राखलं. स्पेनचा बर्गोस बर्पेललेट बीएच संघ (28 तास 42 मिनिटे 09 से.) दुसऱ्या, तर मलेशियाचा तेरेंगानू सायकलिंग संघ (28 तास 48 मिनिटे 19 से.) तिसऱ्या स्थानावर राहिला. स्पर्धेच्या चौथ्या टप्प्यात 'ली निंग स्टार' संघाच्या ॲलिक्सेईनं बाजी मारली. त्याचा सहकारी कॅमेरून निकोलस स्कॉट यानं दुसऱ्या क्रमांकावर शर्यत पूर्ण केली. तर 'रूजाई इन्शुरन्स विनस्पीड' संघाच्या डायलन हॉपकिन्स यानं तिसरं स्थान मिळवलं. या सर्वांच्या केंद्रस्थानी ल्यूक होता.

9 तासात स्पर्धा केली पूर्ण : पाच खंडांतील 35 देशांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या 29 संघांमधील 164 एलिट (अव्वल) रायडर्सविरुद्ध स्पर्धा करताना ल्यूकनं एकूण 9 तास 33 मिनिटं 04 सेकंद अशा एकूण वेळेत ही शर्यत पूर्ण केली. थायलंडच्या 'रूजाई इन्शुरन्स विनस्पीड' संघाचा आणि ल्यूकचा सर्वांत जवळचा स्पर्धक एलन कार्टर बेटल्स केवळ 14 सेकंदांनी मागं राहिला. तर बेल्जियमचा 'टार्टेलेटो-आयसोरेक्स' संघाचा योर्बेन लॉरीसेन 33 सेकंदांच्या फरकानं तिसऱ्या स्थानावर राहिला.

स्पर्धेवर राखलं वर्चस्व : ल्यूकनं पहिल्या दिवशी 'मुळशी-मावळ माईल्स'च्या टप्प्यात 'यलो जर्सी' आपल्या नावावर केली होती. त्यानंतर ती शेवटपर्यंत कोणालाही मिळवू दिली नाही. सातत्यपूर्ण कामगिरीमुळं त्यानं स्पर्धेत सर्वाधिक गुण मिळवणारा खेळाडू म्हणून 'ग्रीन जर्सी'देखील पटकावली. अशाप्रकारे, जिद्द आणि धोरणात्मक चातुर्य यांचा मेळ घालून त्यानं या आठवड्याचा यशस्वी समारोप केला.

...ते दृश्य विलोभनीय : "माझा संघ खरोखरच खूप चांगला आहे. त्यांनी सुरुवातीपासून शेवटपर्यंत माझी काळजी घेतली. तुम्ही गेल्या दोन दिवसांत पाहिल्याप्रमाणं आमच्या इतर दोन रायडर्सनी विजय मिळवला. त्यामुळं आम्ही तीन वेगवेगळ्या रायडर्ससह विजय मिळवले आहेत आणि आजचा हा विजय मिळवण्यासाठी खूप कष्ट, उत्तम सांघिक काम, भरपूर सराव आणि तासनतास दिलेला वेळ या सर्वांचं योगदान आहे. त्यामुळं हा विजय माझ्या संघासाठी आहे. आजचा दिवस खरोखरच अप्रतिम होता. मी याआधी कधीही अशी गर्दी पाहिली नव्हती. रस्त्याच्या कडेला लोकांच्या रांगा लागल्या होत्या. ते दृश्य विलोभनीय होतं. मला आशा आहे की प्रत्येकानं या रेसिंगचा आनंद घेतला असेल, मला पुढच्या वर्षी पुन्हा इथं यायला नक्कीच आवडेल, अशी प्रतिक्रिया ल्यूकनं दिली.

ऑलिम्पिक स्पर्धांचं यजमानपद भारताला मिळावं : "बजाज पुणे ग्रँड टूर या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेला शहर व ग्रामीण भागातील क्रीडारसिकांनी मोठ्या उत्साहात प्रतिसाद दिला आहे. युवक, युवती,महिला, शेतकरी, विद्यार्थी आदी सर्व घटकांचा त्यात सहभाग दिसून आला. आगामी ऑलिम्पिक स्पर्धांचे यजमानपद भारताला मिळावं यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील आहेत. क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि प्रतिभावंत खेळाडू घडावेत या उद्देशानं श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी इथं उभारण्यात आलं आहे.

# दहावी-बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी शिक्षण विभाग आक्रमक; कोणकोणत्या उपाययोजनांची तयारी?

**दैनिक युवक आधार**

**पुणे, प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्य मंडळ) इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांदरम्यान कॉपीमुक्तीसाठी कंबर कसली आहे. बारावीच्या परीक्षेसाठी सुमारे १५ लाख ३२ हजार ८६२, तर दहावीच्या परीक्षेसाठी १६ लाख १४ हजार ९८७ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. राज्यभरातील ८० टक्क्यांहून अधिक परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा असून, परीक्षेदरम्यान भरारी पथकाने गैरप्रकार पकडल्यास संबंधित केंद्राची मान्यता रद्द करण्यात येणार आहे.



राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत याबाबतची माहिती दिली. शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह उपस्थित होते. बारावीची परीक्षा ३ हजार ३८७ केंद्रांवर, तर दहावीची परीक्षा पाच हजार १११ केंद्रांवर घेतली जाणार आहे. परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविण्यासाठी राज्यातील सुमारे ८० टक्के परीक्षा केंद्रांवरील वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. सर्व संवेदनशील केंद्रांवर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे. संशयास्पद हालचाली आढळल्यास तत्काळ कारवाई केली जाणार आहे.

'गेल्या वर्षीच्या दहावी–बारावीच्या परीक्षांमध्ये गैरप्रकार झालेल्या दहावीच्या ३१, तर बारावीच्या ७६ केंद्रांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. यंदाही गैरप्रकार आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येणार आहे,' असे कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

'राज्यभर कॉपीमुक्ती मोहिमेंतर्गत विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, नैतिकता आणि परीक्षेचे गांभीर्य समजावण्यासाठी जनजागृती सप्ताहासह शपथ, मार्गदर्शन सत्रे, पालक-विद्यार्थी संवाद कार्यक्रम आयोजिण्यात येत आहेत. समाज माध्यमाद्वारेही जागृती करण्यात येत आहे. परीक्षेवेळी राज्यस्तरीय समितीबरोबरच जिल्हास्तरीय दक्षता समित्या आणि भरारी पथके कार्यान्वित असतील. परीक्षा केंद्रांना अचानक भेट देऊन भरारी पथकांकडून तपासणी केली जाणार आहे. तसेच, पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग, जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयातून परीक्षांवर देखरेख ठेवली जाणार आहे,' असे कुलकर्णी यांनी सांगितले.

# पैठण येथील जिल्हा कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या कैद्याने जीवन संपविले

**दैनिक युवक आधार**

**पैठण, प्रतिनिधी :** पैठण ते शेवगाव मार्गावरील जिल्हा खुले कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या कैद्याने शुक्रवारी (दि.२३) सकाळी कारागृहाच्या पाठीमागील मोकळ्या जागेतील चिंचाच्या झाडाला दोरीच्या साह्याने गळफास लावून जीवन संपविले. शांतीलाल तान्ह्या ओझरे (वय ४४, रा. पालघर) असे मृताचे नाव आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की, पैठण येथे नाशिक कारागृहातून जन्मठेपेची शिक्षा भोगण्यासाठी २०२३ मध्ये बंदी क्रमांक सी. ५५१३ शांतीलाल ओझरे हा बंदी शिक्षा भोगण्यासाठी पैठण येथील जिल्हा खुले कारागृहात येथे वर्ग झालेला होता.

नित्यनियमाने कारागृहाच्या शेतीत काम करून आपली सजा भोगत होता. त्याने आज सकाळी कारागृहाच्या भिंतीच्या पाठीमागे असलेल्या चिंचेच्या झाडाला दोरीने गळफास घेतल्याचा प्रकार कारागृहातील इतर कैद्यांच्या निदर्शनास आला.

ही घटना पैठण खुले कारागृह अधीक्षक राजेंद्र निमगडे यांना देण्यात आली. तातडीने कारागृहाच्या प्रशासनाने या घटनेची खबर पैठण पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांना दिल्यामुळे पैठण पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले.

# मणिपूरची साथ, पालघरचे हात, बांबूच्या तिरंग्यातून गुंफले राष्ट्रप्रेम

**दैनिक युवक आधार**

**पालघर, प्रतिनिधी :**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यातील आदिवासी महिलांनी बांबूपासून तिरंगा झेंडासाठी लागणारे स्टँड तयार करून नवा आदर्श निर्माण केला आहे. असीम फाउंडेशन आणि केशव सृष्टी या संस्थांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला असून, तयार करण्यात आलेले २०० झेंडे विक्रीसाठी पुण्याला पाठवण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, या मोहिमेत पालघरच्या महिलांसोबत मणिपूरमधील महिलांचाही सहभाग असून, ही एकात्मतेची नवी वीण बांबूच्या माध्यमातून विणली गेली आहे.

शहरातील प्लास्टिकचे प्रदूषण कमी करणे, चिनी वस्तूंवर बहिष्कार टाकणे आणि स्थानिक बांबू लागवडीला प्रोत्साहन देणे या त्रिसूत्रीवर हा उपक्रम आधारित आहे. यापूर्वी या महिलांनी बांबूपासून भारताचा नकाशा पूर्णपणे हाताने कोरून तयार केला होता, ज्याची सर्वत्र प्रशंसा झाली. आता तिरंगा बनवण्याच्या मोहिमेत मणिपूरच्या महिलांनी झेंड्याचा



कापडी भाग तयार केला, तर पालघरच्या भगिनींनी बांबूपासून त्याचा दांडा आणि सुबक स्टँड बनवले आहेत.केशवसृष्टी ही संस्था गेल्या सात वर्षापासून काम करत असून २५० हून अधिक महिला या कामे सहभागी झाले आहेत. यामध्ये ९० टक्के आदिवासी महिलांचा सहभाग आहे. महिलांना समृद्ध करण्याच्या दृष्टीने विक्रमगड व जव्हार येथील २८ गावे समाविष्ट करण्यात आली असून मोखाडा तालुक्यात विस्तार करण्याचे नियोजन आहे. विक्रमगड व मणिपूर येथील महिलांनी सहकार्याने तयार केलेले झेंडे व स्टॅन्ड १५ जानेवारी रोजी पुण्यातील असीम फाउंडेशनकडे सुपूर्द करण्यात आले असून त्यांच्यातर्फे मागणीनुसार पुढे देण्यात येणार आहे.

# हा शिक्षण विभाग आहे की कॉल सेंटर?

**दैनिक युवक आधार**

**राजू शिंदे/महाराष्ट्र उपसंपादक :** २००० शिक्षकांचा तालुका,पण अधिकारी फोनवर...भोकरदनमध्ये प्रभारी व्यवस्थेचा शिक्षणावर घाला..

दैनिक युवक आधार उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे :भोकरदन तालुक्यातील शिक्षण विभागाचा कारभार कार्यालयीन फाईली,प्रत्यक्ष भेटी किंवा क्षेत्रभेटींवर नव्हे,तर केवळ फोन कॉल्सवर चालत असल्याचे विदारक वास्तव समोर आले आहे.या 'फोनराज'चा थेट फटका विद्यार्थ्यांच्या भवितव्याला बसत असून,संपूर्ण शिक्षण यंत्रणा प्रभारी व्यवस्थेच्या दलदलीत रुतली असून जिल्हाधिकारी लक्ष घालत दोशीवर कारवाई करत तसेच नियमित गटशिक्षणाधिकारी,शिक्षणविस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुखांची तातडीने नियुक्ती देणार का?..की भोकरदनचा शिक्षण विभाग असाच फोनवर चालू देणार?...हाच खरा आणि जळजळीत प्रश्न पालक वर्गाला पडला आहे.

**(1)फाईली नाहीत,क्षेत्रभेटी नाहीत... फक्त फोनराज...!**

भोकरदन तालुक्यातील शिक्षण विभागाचा कारभार कार्यालयीन फाईली,प्रत्यक्ष भेटी किंवा क्षेत्रतपासणीवर नव्हे, तर केवळ फोन कॉल्सवर चालत असल्याचे विदारक वास्तव समोर आले आहे.या फोनराजाचा थेट फटका विद्यार्थ्यांच्या भवितव्याला बसत असून संपूर्ण शिक्षण यंत्रणा प्रभारी व्यवस्थेच्या दलदलीत अडकली आहे.

**(2)२००० शिक्षकांचा तालुका, पण नियमित गटशिक्षणाधिकारी नाही**

जालना जिल्ह्यात भौगोलिक व शैक्षणिकदृष्ट्या सर्वात मोठा तालुका असलेल्या भोकरदनमध्ये जिल्हा परिषद व खासगी संस्थांचे मिळून तब्बल २००० शिक्षक कार्यरत आहेत.मात्र एवढ्या मोठ्या व संवेदनशील तालुक्यासाठी आजतागायत नियमित गटशिक्षणाधिकारीच नेमण्यात आलेला नाही.

**(3)१७ केंद्रप्रमुखांची नावेही माहित नाहीत**

परिस्थिती किती गंभीर आहे, याचे उदाहरण म्हणजे तालुक्यातील १७ केंद्रप्रमुखांची नावे व ओळखसुद्धा प्रभारी गटशिक्षणाधिकाऱ्यांना माहित नाहीत.सर्व शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून, १७ केंद्रप्रमुखांपैकी फक्त दोनच नियमित




आहेत.

**(4)एकाच अधिकाऱ्यावर सगळा भार**

दोन केंद्रप्रमुख अभावित असून, त्यापैकी एका केंद्रप्रमुखावर प्रभारी शिक्षणविस्तार अधिकाऱ्याचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. तो एकटाच आपल्या क्षमतेनुसार शिक्षण विभागाचा गाडा कसाबसा हाकत आहे. मात्र तो अधिकारीही या महिन्यात सेवानिवृत्त होत असल्याने पुढे काय? हा मोठा प्रश्न आहे.

**(5)सगळेच प्रभारी... जबाबदार कोणीच नाही**

उर्वरित सर्व केंद्रप्रमुखांची पदे रिक्त असून त्या ठिकाणी शिक्षकांना प्रभारी म्हणून नेमण्यात आले आहे. परिणामी सगळेच प्रभारी, पण जबाबदार कोणीच नाही अशी अवस्था निर्माण झाली आहे.

**(6)शाळांमध्ये गैरहजेरी,कामचुकारपणा वाढला**

खालच्या स्तरावरील कर्मचाऱ्यांवर कोणाचाही वचक उरलेला नाही.अनेक शाळांमध्ये शिक्षकांची गैरहजेरी,अध्यापनाकडे दुर्लक्ष व कामचुकारपणा खुलेआम सुरू आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असताना प्रशासन मात्र मूक प्रेक्षक बनले आहे.

**(7)आठवड्यातून एक दिवस कार्यालय, बाकी फोनवर कारभार**

गटशिक्षणाधिकारी आठवड्यातून केवळ एकदाच कार्यालयात हजेरी लावतात.उर्वरित वेळ फोनवर आदेश देऊन कामकाज रेटले जाते. परिणामी फाईली प्रलंबित, शिक्षकांचे प्रश्न रखडलेले आणि कार्यालयीन कामांचा डोंगर वाढत चालला आहे.

**(8)जबाबदारी कुणाची? थेट सवाल**

भोकरदनसारख्या मोठ्या तालुक्यात शिक्षण विभागाचा कारभार जर 'फोनराज'वर चालत असेल, तर प्रशासनाची जबाबदारी नेमकी कुणाची? विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात असताना वरिष्ठ अधिकारी डोळेझाक करत आहेत का, की ही परिस्थिती त्यांना मान्य आहे?

# सिल्लोडच्या राजकीय पटावर सत्तारांचा 'शह-काटशह'; कमळाच्या ताकदीला नाराजांच्या 'पक्षांतरा'चे ग्रहण!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या राजकारणाचे 'पॉवर सेंटर' असलेल्या सिल्लोड-सोयगाव मतदारसंघात सध्या राजकीय संघर्षाने परमोच्च बिंदू गाठला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीतील घटक पक्षांमध्येच 'आरपार'ची लढाई रंगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. आमदार अब्दुल सत्तार यांनी कोणत्याही स्थानिक तडजोडीची वाट न पाहता 'एकला चलो रे'चा हुकमी एक्का टाकला असून, दुसरीकडे भाजपमधील अंतर्गत नाराजीमुळे सत्तारांचे पारडे सध्या तरी भाजपपेक्षा अधिक जड असल्याचे चित्र दिसत आहे.

**निष्ठावंतांची अस्वस्थता सत्तारांच्या पथ्यावर?**

मतदारसंघात भाजपला सर्वात मोठा फटका त्यांच्या स्थानिक संघटनात्मक पातळीवर बसताना दिसत आहे. गेली अनेक वर्षे पक्षाचा झेंडा खांद्यावर घेणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना उमेदवारी प्रक्रियेत डावलले गेल्याची भावना प्रबळ आहे. विशेष म्हणजे, ज्या निष्ठावंतांनी तळागाळात पक्ष वाढवला, त्यांनीच आता सत्तारांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश करण्याचा सपाटा लावला आहे. सत्तारांनी या परिस्थितीचा पुरेपूर राजकीय लाभ उठवत विरोधकांची 'घेराबंदी' केली आहे. यामुळे भाजपची पारंपरिक मते विभागली जाण्याची भीती निर्माण झाली असून सत्तारांची ताकद मात्र द्विगुणित झाली आहे.

**मैदानात 'मैत्री' बाजूला, थेट 'कुस्ती'!**





आमदार अब्दुल सत्तार यांनी आजवरच्या राजकीय प्रवासात स्थानिक स्वराज्य संस्थांवर आपली मजबूत पकड कायम ठेवली आहे. नगरपरिषदेत विरोधकांना धूळ चारल्यानंतर, आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीवरही आपलेच वर्चस्व राहील, असा विश्वास सत्तारांच्या गोटातून व्यक्त होत आहे. "विकासाच्या मुद्द्यावर आम्ही मैदानात आहोत," असा दावा करत सत्तारांनी भाजपला खुले आव्हान दिले आहे. भाजपमधील तिकीट वाटपावरून झालेला गोंधळ सत्तारांच्या पथ्यावर पडला असून, ग्रामीण भागात सत्तारांचा झंझावात सद्यस्थितीत विरोधकांवर वरचढ ठरताना दिसत आहे.

**अटीतटीचा 'महा-मुकाबला'**

शिवना, अंधारी, भराडी आणि घाटनांद्रा या महत्त्वाच्या गटांमध्ये होणाऱ्या लढती आता केवळ स्थानिक राहिलेल्या नसून, त्या आगामी विधानसभा निवडणुकीची नांदी ठरणार आहेत.

# महिलांना रोजगाराचा नवा मार्ग!; कारंजा लाडमध्ये हातमाग प्रशिक्षण केंद्राचा दिमाखदार शुभारंभ

## मान.आमदार सौ.सईताई डहाके व माजी आमदार श्री.विजयराव जाधव यांच्या उपस्थितीत ऐतिहासिक उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** कारंजा लाड (जि. वाशिम) ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आज कारंजा लाड येथे टाकण्यात आले. भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयांतर्गत Weavers' Service Centre, नागपूर यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या SAMARTH Training Programme (NHDP अंतर्गत) अंतर्गत Frame Loom या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या हातमाग विणकाम प्रशिक्षण केंद्राचे उद्धाटन मान. आमदार सौ. सई ताई डहाके यांच्या हस्ते आणि माजी आमदार श्री. विजयराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडले.

हे प्रशिक्षण केंद्र समयमती हातकरघा प्रशिक्षण व विक्री केंद्र, कारंजा लाड, जि. वाशिम येथे सुरू करण्यात आले असून या उपक्रमांतर्गत २२ जानेवारी २०२६ ते १७ मार्च २०२६ या कालावधीत सुमारे ३०




महिलांना प्रत्यक्ष हातमाग विणकामाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे प्रशिक्षणार्थींना दररोज ₹३००/- मानधन दिले जाणार असल्याने महिलांना कौशल्याबरोबरच आर्थिक आधारही मिळणार आहे.

कार्यक्रमात बोलताना मान. आमदार सौ. सई ताई डहाके यांनी सांगितले की,

“महिलांनी परंपरागत उद्योगात आधुनिक कौशल्य आत्मसात करून स्वतःचा रोजगार निर्माण करावा. हातमाग उद्योग हे आपल्या संस्कृतीचे वैभव आहे आणि ते टिकवण्यासाठी महिलांची भूमिका फार महत्त्वाची आहे.”

यावेळी माजी आमदार श्री. विजयराव जाधव यांनीही महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले की,“ग्रामीण महिलांच्या हातात कौशल्य आणि रोजगार दिल्यास संपूर्ण कुटुंब आणि गावाचा विकास होतो. असे प्रशिक्षण उपक्रम हे खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवणारे आहेत.”या कार्यक्रमास वस्त्रोद्योग विभागाचे उपसंचालक श्री संदीप ठुबरीकर, तांत्रिक अधीक्षक श्री नरेशजी वरघने, तसेच सुदेश गुळकरी, सुरेशजी तांगडे, संदीप तांगडे, मनीषा तांगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या ३० महिला मोठ्या उत्साहाने उपस्थित होत्या.

या प्रशिक्षणामुळे महिलांचे कौशल्यविकसन होऊन त्यांना स्थानिक व राष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच पारंपरिक हातमाग उद्योगाला नवी उभारी मिळेल, असा विश्वास सर्व मान्यवरांनी व्यक्त केला.हातमाग क्षेत्रात काम करण्याची इच्छा असलेल्या महिलांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

**प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी संपर्क – मनीषा तांगडे मोबा. 9273596088**

# दैनिक युवक आधार च्या बातमीचा जबरदस्त इफेक्ट!

## जउळका येथील दबंग ठाणेदार हिवरकर साहेबांनी घेतली तात्काळ दखल वरली, मटका, दारू व अवैध धंद्यांना लावला चोप – परिसरात कायदा सुव्यवस्थेला बळ

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** दैनिक युवक आधार या निर्भीड व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीची तात्काळ व ठोस दखल घेत जउळका पोलीस ठाण्याचे दबंग व कर्तव्यदक्ष ठाणेदार हिवरकर साहेबांनी मोठी कारवाई केली आहे. परिसरात सुरू असलेल्या वरली, मटका, अवैध दारू व इतर बेकायदेशीर धंद्यांवर जोरदार चोप लावत गुन्हेगारांचे धाबे दणाणून सोडले आहेत.

दैनिक युवक आधारने समाजहितासाठी निर्भीडपणे मांडलेल्या वास्तवावर कारवाई करत ठाणेदार हिवरकर साहेबांनी दाखवून दिले की, पत्रकारिता आणि पोलीस

> नागरिकांनी देखील अशा बेकायदेशीर धंद्यांविरोधात आवाज उठवावा व प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

> ठाणेदार हिवरकर साहेब – गुन्हेगारांवर वचक ठेवणारे कर्तव्यनिष्ठ अधिकारी

> दैनिक युवक आधार – समाजाच्या बाजूने उभं राहणारं निर्भीड दैनिक

प्रशासन एकत्र आले तर समाजातील गैरव्यवहार मोडून काढणे शक्य आहे.

या कारवाईमुळे जउळका परिसरात कायदा व सुव्यवस्थेला बळ मिळाले असून, नागरिकांमध्ये समाधान आणि विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक दिवसांपासून त्रस्त असलेले नागरिक आता निर्धास्त श्वास घेत आहेत.



Page 4
08 Jan 2026

दैनिक
Epaper.YuvakAadhar.In
युवक आधार
संपादक : श्री. संतोष शिवदास आमले

दारूअड्ड्यांमुळे गावात महिलांचे जगणे असुरक्षित

“संध्याकाळ झाली की घराबाहेर पडायची भीती वाटते” — जऊळका हद्दीतील महिलांचे वास्तव

दैनिक युवक आधार

करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी : जऊळका (वाशिम ) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खेड्यांमध्ये सुरू असलेल्या अवैध देशी व विदेशी दारूविक्रीमुळे महिलांच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होत असल्याचे चित्र समोर येत आहे. गावातील अनेक महिलांच्या म्हणण्यानुसार, संध्याकाळनंतर घराबाहेर पडणे धोक्याचे वाटू लागले असून भीती, अस्वस्थता आणि असुरक्षिततेची भावना वाढली आहे.

एका गावातील महिलांनी सांगितले की, दारूच्या नशेत असलेली मंडळी रस्त्यावर उभे राहून ये-जा करणाऱ्या महिलांकडे टक लावून पाहणे, अश्लील टिप्पणी करणे, शिवीगाळ करणे असे प्रकार सर्रास घडत आहेत. “कामावरून परतताना किंवा किराणा आणायला गेल्यावर नजर चुकवून चालावे लागते,” असे एका महिलेनं सांगितले. काही ठिकाणी तर रस्ते बदलून जाण्याची वेळ येते, अशीही भावना महिलांनी व्यक्त केली.

दारूअड्ड्यांमुळे घरगुती हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचेही महिलांचे अनुभव सांगतात. दारू पिऊन घरी येणारे पुरुष वाद घालणे, मारहाण करणे, खर्चासाठी दबाव टाकणे यामुळे अनेक घरांत शांतता उरलेली नाही. “मुलांसमोर भांडणं होतात, अभ्यासावर परिणाम होतो,” असे एका आईने सांगितले. काही महिलांनी तर कर्जबाजारीपणाची, रोजच्या खर्चाची चिंता व्यक्त केली.

महिलांच्या मते, तक्रार करायची इच्छा असूनही भीतीमुळे आवाज उठवता येत नाही. “तक्रार केली तर उद्या त्रास वाढेल,” अशी भीती अनेक जणींना वाटते. काहींनी सांगितले की, तोंडी तक्रारी केल्यानंतर परिस्थितीत बदल दिसला नाही; उलट दारूअड्डे अधिक बिनधास्त सुरू असल्याचे जाणवते.

गावातील महिला बचत गटांतील सदस्यांनीही चिंता व्यक्त केली. त्यांच्या मते, दारूअड्ड्यांमुळे महिलांच्या रोजगारावर परिणाम होत आहे. स्वयंरोजगारासाठी बाहेर पडणे, बैठकांना जाणे, उशिरापर्यंत काम करणे कठीण झाले आहे. “आम्हाला सुरक्षित वाटत नाही,” असे त्या म्हणाल्या.

महिलांनी एकमुखाने सांगितले की, कायदा आमच्यासाठी असायला हवा, पण प्रत्यक्षात आम्हीच असुरक्षित आहोत. दारूअड्डे बंद झाले तर गावात शांतता परत येईल, मुलांचे भविष्य सुरक्षित होईल आणि महिलांना मोकळेपणाने वावरता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या पार्श्वभूमीवर महिलांची स्पष्ट मागणी आहे की, अवैध दारूविक्री तातडीने थांबवावी, दारूअड्ड्यांवर कठोर कारवाई करावी आणि महिलांच्या सुरक्षिततेस प्राधान्य द्यावे. “आम्हाला संरक्षण हवे, आश्वासन नको,” असा ठाम सूर महिलांच्या अनुभवांतून उमटत आहे.

# मुख्यमंत्री ‘माझी शाळा सुंदर शाळा’ टप्पा क्रमांक ३ मध्ये

## मादळमोही केंद्रातून संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूल प्रथम

**दैनिक युवक आधार**

**गेवराई प्रतिनिधी :** मादळमोही राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री ‘माझी शाळा सुंदर शाळा’ या उपक्रमाच्या टप्पा क्रमांक तीन मध्ये मादळमोही केंद्रातून संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूल प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

शाळेच्या सुंदर व स्वच्छ परिसराची निगा, वृक्षलागवड, रंगरंगोटी, शैक्षणिक व सांस्कृतिक वातावरण, विद्यार्थ्यांचा सहभाग तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणीमुळे शाळेला हे मानांकन प्राप्त झाले. या




उपक्रमात शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.पुढील फेरी तालुकास्तरीय होणार आहे .यासाठी शाळेची पूर्ण तयारी आहे येणाऱ्या काळामध्ये नक्कीच तालुकास्तरीय प्रथम क्रमांक येईल असा विश्वास शाळेचे मुख्याध्यापक यांनी व्यक्त केला आहे.

या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री भीमराव गावडे ,श्रीमती शिवनंदा गावडे ,श्रीमती आशा रसाळ ,श्रीमती सारिका जाधव,अबोली भोपळे ,श्रीमती कल्पना जाधव ,श्री सिद्धार्थ शेजवळ सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. ही कामगिरी इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# आत्महत्येच्या उंबरठ्यावर असलेल्यांसाठी राजाराम जोशींचा आधार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** वाशी खाडी परिसरात आत्महत्येच्या विचारांनी ग्रासलेल्या अनेक व्यक्तींना नवसंजीवनी देण्याचे कार्य एका सामान्य नागरिकाने आपल्या धैर्याने आणि माणुसकीने केले आहे. नवी मुंबई वाशी गावातील रहिवासी राजाराम जोशी हे गेल्या काही वर्षांपासून जीव धोक्यात घालून संकटात सापडलेल्या व्यक्तींना वाचवत आहेत.

वाशी खाडी ही अनेकांसाठी आत्महत्येचे ठिकाण ठरत असताना, तिथे उडी मारण्याच्या



तयारीत असलेल्या व्यक्तींशी संवाद साधून, त्यांचे समुपदेशन करून त्यांना त्या टोकाच्या निर्णयापासून परावृत्त करण्याचे काम जोशी करत आहेत. आर्थिक अडचणी, कौटुंबिक तणाव, व्यसनाधीनता, मानसिक अस्वस्थता यामुळे अनेक जण हतबल होतात. अशा वेळी जोशी हे त्यांच्यासाठी आशेचा किरण ठरतात.

आजवर त्यांनी ५० हून अधिक व्यक्तींचे प्राण वाचवले असून, अनेक वेळा पोलिस व अग्निशमन दलाच्या मदतीनेही ही कामगिरी पार पाडली आहे. मात्र, ही जबाबदारी त्यांनी कोणत्याही मोबदल्याच्या अपेक्षेशिवाय स्वीकारली आहे. “समोरचा माणूस वाचला, हेच माझे बक्षीस आहे,” असे ते सांगतात.

कठीण प्रसंगी स्वतःचा जीव धोक्यात घालून दुसऱ्याचा जीव वाचवणाऱ्या राजाराम जोशी यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असले, तरी आजवर त्यांना कोणत्याही शासकीय किंवा सामाजिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले नाही, ही बाब खेदजनक आहे.

आत्महत्या हा उपाय नाही, तर प्रत्येक समस्येवर मार्ग असतो, हा विश्वास निर्माण करण्याचे काम जोशी सातत्याने करत आहेत. समाजातील प्रत्येक घटकाने अशा कार्यकर्त्यांना पाठबळ दिल्यास अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होण्यापासून वाचू शकतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# यात्रेत गोंधळ घालणाऱ्यांची खैर नाही!; ठाणेदार हिवरकरांचा थेट इशारा

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** मालेगाव नात नंगे महाराज डव्हा व जय अवलिया महाराज काळामाथा यात्रेच्या पार्श्वभूमीवर जवळका परिसरात पोलीस प्रशासन पूर्ण सज्ज झाले आहे. यात्रेदरम्यान हुल्लडबाजी, चोरी, शिस्त मोडणे, दादागिरी किंवा कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा कडक आणि थेट इशारा जवळका पोलीस ठाण्याचे दबंग ठाणेदार श्री. हिवरकर यांनी दिला आहे.

“ही यात्रा श्रद्धा, शांतता आणि शिस्तीची आहे. भाविकांची सुरक्षितता आमच्यासाठी सर्वात महत्त्वाची आहे. कोणीही कायदा हातात घेतला, महिलांची छेडछाड केली, चोरी केली, दहशत माजवली किंवा दादागिरी केली, तर त्याच्यावर तात्काळ आणि कठोर कारवाई केली जाईल. कोणालाही माफी नाही,” असा स्पष्ट संदेश ठाणेदार हिवरकर यांनी दिला.

यात्रेच्या संपूर्ण मार्गावर वाढीव पोलीस बंदोबस्त,



साध्या वेशातील पोलीस, रात्रीचे गस्त पथक, तसेच संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे २४ तास नजर ठेवली जाणार आहे. संशयास्पद व्यक्तींवर बारीक लक्ष ठेवून वेळीच कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

तसेच नागरिकांनी व भाविकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, शांतता राखावी, कोणताही संशयास्पद प्रकार दिसल्यास तात्काळ जवळच्या पोलीस कर्मचाऱ्यांना किंवा ठाण्यात कळवावे, असे आवाहनही ठाणेदार हिवरकर यांनी केले आहे.काळामाथा यात्रेत कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांचा दणका – गोंधळ करणाऱ्यांवर ‘कडक कारवाई’ अटळ!

# पालोदच्या माणिकराव पालोदकर महाविद्यालयात 'आनंद नगरी'चा जल्लोष!

## ९० हून अधिक स्टॉल्स; चिमुकल्या विक्रेत्यांनी गिरवले व्यावसायिक गणिताचे धडे

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना व्यावहारिक आणि आर्थिक जगाची ओळख करून देण्यासाठी, सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात भव्य 'बाल आनंद नगरी'चे आयोजन करण्यात आले होते. या आगळ्यावेगळ्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून वस्तूंची विक्री केली. यातून विद्यार्थ्यांना स्वावलंबन, आर्थिक देवाणघेवाण आणि संभाषण कौशल्य आत्मसात करण्यास मोठी मदत झाली.

या आनंद नगरीचे उद्धाटन जि .प.पालोदचे मुख्याध्यापक दिलीप सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आले . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे होते. याप्रसंगी इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात ९० हून अधिक स्टॉल्स लावले होते. या बाजारात आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थ, पालक आणि परिसरातील शाळा-महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती

**चुलीवरच्या पदार्थांची मेजवानी**

विद्यार्थ्यांनी भारतीय पद्धतीने चूल मांडून बनवलेले गरमागरम भजे, पराठे, आलू वडा, अंडावडे आणि गुळाचा चहा या पदार्थांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले . याव्यतिरिक्त पाणीपुरी, उपमा, आईस्क्रीम, केक, लिंबू शरबत, मिठाई, इडली-डोसा, समोसा, कचोरी, पापड आणि गुलाब जामुन अशा विविध खाद्यपदार्थांची रेलचेल होती. ग्राहक बनून आलेल्या पालकांशी संवाद साधताना आणि हिशोब ठेवताना चिमुकल्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास ओसंडून वाहत होता.

**नफ्यापेक्षा संस्कारावर भर**

"विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, नियोजन आणि पैशांचे महत्त्व रुजावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे," असे प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे यांनी आपल्या मनोगतात





सांगितले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष खरेदी-विक्रीतून व्यवहार ज्ञानाचे धडे गिरवले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक प्रदीप कानडजे, कृष्णा भांडारे, सुनील तांबे, कृष्णा पाटील, राजेश ठोंबरे, सुनील सागरे, भास्कर केरले, जयश्री चापे, महादेवी ठवरे, योगेश निंभोरे, प्रफुल कळम, राजाभाऊ भोसले, विक्की चांदुरकर, डॉ. गणेश दिवटे, डॉ. रमेश काळे, संतुकराव मोरे आणि अक्षय निकम यांनी विशेष परिश्रम घेतले.